महाराष्ट्र शासन

शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. Go.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com

---

जा.क्र.शिउसं/उमाशि/ पुवि/२०१६-१७/ 22062 दि.- / /२०१६.

21 DEC 2016

प्रति,

सर्व प्राचार्य,

कनिष्ठ महाविद्यालय, पुणे व पिंपरी चिंचवड

महानगरपालिका क्षेत्र.

विषय:- कनिष्ठ महाविद्यालयीन वाणिज्य व कला शाखेच्या अकाउंटस , अर्थशास्त्र, इंग्रजी विषय शिक्षकांचे एक दिवसाचे उदबोधन वर्गास शिक्षकांना पाठविणेबाबत.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये २४५ कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढ होण्यासाठी तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे परिपत्रकानुसार परीक्षा पध्दतीबाबत शिक्षकांना मार्गदर्शन करणेकामी वाणिज्य व कला शाखेच्या शिक्षकांचे एक दिवसाचे उदबोधन वर्गाचे शुक्रवार दि.२३.१२.२०१६ वेळ सकाळी ०९ ते सायं.५.३० या वेळेत आयोजन बी.एम.सी.सी महाविद्यालय, प्रभात रोड, पुणे ४ येथे आयोजित केलेले आहे.

| अ.क्र. | दिनांक | विषय |
|---|---|---|
| १ | २३.१२.२०१६ | अकाउंटस , अर्थशास्त्र, इंग्रजी |

उदबोधन वर्गासाठी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य व कला शाखेच्या अकाउंटस , अर्थशास्त्र, इंग्रजी विषयाचे अध्यापन करणा-या शिक्षकांना शुक्रवार दि.२३.१२.२०१६ रोजी सदर उदबोधन वर्गास पाठविणे बंधनकारक राहील. त्याचप्रमाणे प्राचार्यांनी उदबोधन वर्गाच्या कालावधीत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून उर्वरित शिक्षकांच्या मदतीने अध्यापनाचे नियोजन करावे, त्याबाबत या कार्यालयाकडे कोणतीही तक्रार येणार नाही याची दक्षता घ्यावी. सदरचे उदबोधन वर्गास उपस्थितीचा कालावधी सेवाकाळ म्हणून समजण्यात येईल. उपस्थित राहणा-या शिक्षकांना नियमाप्रमाणे प्रवास व दैनिक भत्ता त्यांच्या मूळ आस्थापनेवर अनुज्ञेय राहील.

सोबत :- उदबोधन वर्गाचे वेळापत्रक.

(दिनकर टेमकर)

शिक्षण उपसंचालक

पुणे विभाग, पुणे-१

प्रत :-१.मा.आयुक्त शिक्षण, शिक्षण संचालनालय, म.रा. पुणे.

२.मा.शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे. १.

कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे उदबोधन वर्गाचे वेळापत्रक
शुक्रवार दि.२३.१२.२०१६ एक दिवसाचे सकाळी ०९ ते सायं.५.३० या वेळेत.
स्थळ :- बी.एम.सी.सी महाविद्यालय, प्रभात रोड, पुणे ४

| अ.क्र. | दिनांक २३.१२.२०१६ | उदबोधन वर्गाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | सकाळी ०९ ते १०.३० | शिक्षकांची नाव नोंदणी |
| २ | सकाळी १०.३० ते ११.३० | उदघाटन समारंभ |
| ३ | सकाळी ११.३० ते २.०० | अकाउंटस, अर्थशास्त्र, इंग्रजी विषयाचे अध्यापन पध्दती |
| ४ | दुपारी २.०० ते ३.०० | मध्यांतर |
| ५ | दुपारी ३.०० ते ४.३० | प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा परीक्षा मार्गदर्शन |
| ६ | दुपारी ४.३० ते ५.३० | शिक्षकांच्या अध्यापनाबाबत मत |
| | | उदबोधन वर्गाचा समारोप |

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१